**मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुंबई**
**मध्यवर्ती सुविधा इमारत, तिसरा मजला,**
**सेक्टर-१८, वाशी,तुर्भे, नवी मुंबई-४०० ७०३.**
**<u>दूरध्वनी क्रमांक - ०२२-२७८८९४१६,फॅक्स क्रमांक - ०२२-२२६१४८८८</u>**

मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती,वाशी,नवी मुंबई मध्ये खालीलप्रमाणे एक सॉफटवेअर इंजिनिअर व एक सिनिअर सिस्टीम ॲनालिस्ट ही पदे सहा महिन्याच्या कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने एकत्रित वेतनावर तात्पूरत्या स्वरुपात नमूद केलेल्या अटी व शर्तीवर भरावयाची आहेत. इच्छूक उमेदवारांनी त्यांची वैयक्तीक माहिती,अर्हता व पूर्वानुभवाच्या माहितीबाबतची सर्व कागदपत्रे साक्षांकित प्रतिसह Walk In Interview साठी दिनांक २३.०८.२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजता वरील पत्त्यावर उपस्थित रहावे.

साक्षांकित कागदपत्रे सादर करण्याची वेळ दिनांक २३.०८.२०१७ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० पर्यंत व मुलाखतीची वेळ दिनांक २३.०८.२०१७ रोजी दुपारी २.०० ते ५.०० अशी राहील.

| अ.क्र. | पदाचे नांव | पदांची संख्या | अर्हता व अनुभव | एकत्रित मासिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | सॉफटवेअर इंजिनिअर. | ०१ | १)बी.ई.कॉम्प्युटर किंवा बी.ई.आय.टी. २) सि.सि.ॲनालिस्ट या पदावरील किंवा तत्सम पदावरील कामाचा किमान ७ वर्षाचा अनुभव.३) इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. ४) वय ४० वर्षापेक्षा जास्त नसावे. | ९०,०००/- |
| २ | सिनिअर सिस्टीम ॲनालिस्ट. | ०१ | १)बी.ई.कॉम्प्युटर किंवा बी.ई.आय.टी. २) सि.सि.ॲनालिस्ट या पदावरील किंवा तत्सम पदावरील कामाचा किमान ६ वर्षाचा अनुभव.३) इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. ४) वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. | ६०,०००/- |

१) वरील पदांसाठी उमेदवारांना संगणक प्रोग्रामींग, लॅग्वेजेस C/C++ ,JAVA/.NET,DBMS इत्यादी ज्ञान असणे आवश्यक आहे.

२) सदर पदांसाठी मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती मध्ये सध्या कार्यान्वीत असलेली संगणक प्रणाली बाबतची सर्व माहिती अवगत करुन सदरची प्रणाली कार्यान्वीत ठेवणे तसेच सदर प्रणाली मध्ये बिघाड निर्माण झाल्यास दुरुस्ती करणे. बाजार आवारांच्या कामकाजा प्रमाणे आवश्यक अशी नवीन वेब बेस संगणक प्रणाली विकसित करणे व सदरची नवीन प्रणाली अदयावत ठेवणे असे कामाचे स्वरुप राहिल.

३) वरील दोन्ही पदांसाठी निश्चित केलेली कर्तव्ये, जबाबदा-या व नेमणूकीच्या अटी व शर्ती याचा तपशिल बाजार समितीच्या आस्थापना शाखेत तसेच बाजार समितीच्या संकेत स्थळावर www.mumbaiapmc.org वर उपलब्ध आहे.

४) अर्हता,अनुभव व वयोमर्यादा शिथिल करणे, वेतनाबाबत वाटाघाटी करणे तसेच जाहिरात रद्द करणे इ. बाबतचे अधिकार बाजार समिती प्रशासनाने राखून ठेवलेले आहेत.

दिनांक:-१०.०८.२०१७.

(शिवाजी पहिनकर)
सचिव,
मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती,मुंबई.

**सॉफटवेअर इंजिनिअर व सि.सि.ॲनालिस्ट या पदांसाठीची कर्तव्ये व जबाबदा-या तसेच नेमणूकीसाठीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.**

१) उमेदवाराची नेमणूक सहा महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात राहिल.

२) वरील पदांसाठी उमेदवारांना संगणक प्रोग्रामींग, लॅग्वेजेस C/C++ ,JAVA/.NET,DBMS इत्यादी ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) सदर पदांसाठी मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती मध्ये सध्या कार्यान्वीत असलेली संगणक प्रणाली बाबतची सर्व माहिती आवगत करुन सदरची प्रणाली कार्यान्वीत ठेवणे तसेच सदर प्रणाली मध्ये बिघाड निर्माण झाल्यास दुरुस्ती करणे. बाजार आवारांच्या कामकाजा प्रमाणे आवश्यक अशी नवीन वेब बेस संगणक प्रणाली विकसित करणे व सदरची नवीन प्रणाली अदयावत ठेवणे असे कामाचे स्वरुप राहिल.

४) उमेदवाराची नेमणूक कंत्राटी पध्दतीची असल्याने उमेदवारास कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

५) शासन सेवा व शर्ती खालील ही नेमणूक नसल्याने त्याअनुषंगाने मिळणारे निवृ-ती वेतन, विमा योजना, भ.नि.नि. अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाही. अथवा या पदावर नेमणूक केली आहे त्या पदावर कंत्राटी पध्ये नमूद केलेल्या मुदतीबाहेर कोणतेही अधिकार राहणार नाहीत.

६) उमेदवाराने रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र दयावयाचे आहे. हे करारपत्र ६ महिन्यांकरिता राहिल.

७) काम समाधानकार न आढळल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता सेवा समाप्त केली जाईल.

८) सहा महिन्याच्या कालावधीत शासकीय सट्टया व्यतिरिक्त ४ नैमि-तिक रजा अनुज्ञेय राहतील.

९) उमेदवारांना प्रवास व अनुषंगिक भ-त्यांपोटी दरमहा रु. ५,०००/- अनुज्ञेय राहिल.

१०) उमेदवाराला जर नोकरीचा राजीनामा दयावयाचा असेलतर त्यांनी या कार्यालयास १५ दिवस अगोदर नोटीस दयावी लागेल. अन्यथा एक महिन्याचे वेतन जामीन महसुलाची रक्कम म्हणून वसूल केली जाईल.

सचिव
मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती, मुबई.